म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ८७४
REFBK-0000910
REFBK-0000910

१९९३
स. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ७२४

॥ ...न्न ॥

'...हाभक्त'

# दामाजी

## नाट्यकथानकांतील

प्रासंगिक

# पद्यावली.

लक्ष्मण कृष्ण पेंडसे
यांनीं तयार केली,

ती

...ए. संकेश्वरे, यांनी आपल्या श्री 'वर्धमान छा. छा.
गुरुवारपेठ घर नंबर ७ निपाणी.

पुस्तकासंबंधींचे सर्व हक्क कर्त्यानें आपलेकडे ठेविले आहेत.

किंमत २ आणे.

# विनंति.

प्रभुनाममाहात्म्य आणि संतचरित्र जितकें वर्णन करावें तेवढें थोडेंच. निरनिराळ्या कवींच्या वाक्सुधेनें, आणि चटकदार वर्णनानें, त्यांचें महत्व वाढतच जातें. परमेश्वर लीला व संतचरित्र वर्णनाच्या ईश्वरदत्त अधिकारास अनुसरून; परोपकारी व भगवद्भक्त **दामाजीपंताचें चरित्र** नाटकरूपांत कल्पून त्यावरील कांहीं प्रासंगिक **पद्यें** केलीं आहेत. तीं वाचून, गाऊन व ऐकून माझ्या बंधु भगिनींस मनोरंजक व सद्बोधक व्हावींत, अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

सदर्हु **पद्यें** करण्याचे कामीं रा. विठ्ठल सदाशिव तुरे व रा. काशिनाथ पांडुरंग येवलेकर यांनीं तालसुरांची माहिती दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

निपाणी.
ता० २७।५।१२

**लक्ष्मण कृष्ण पेंडसे,**
**कर्ता.**

REFBK-0000910
REFBK-0000910

॥ ... प्रसन्न ॥

# महाभक्त दामाजी.

## ईशस्तवन.

पद चाल ( दावरदातार ) राग केदार.

भो कृपाल प्रभु दयाल गोपाल, आ आ आ आ आ आ आ आ
अवनि-पाल हरिसि काल, भव भय हर दुरित जाल ॥ भो०॥
तूं ब्रम्हा ब्रम्हपाल । आत्मानात्मादि सकल । स्थिर चर अग
तूचि विमल । दुरितजना करिसि विकल । नमि चरणा, आ
आ आ आ आ आ । भक्तलाल तूं नृपाल ॥ भो० ॥
आदि तूंचि अंत तूंचि । तूंचि विमल शुद्ध सरल । हरि चिंता,
आ आ आ आ आ आ । नंदलाल हारिसि व्याल ॥ भो० ॥

मुलें— पद चाल–( मजा देते है या प्यार )

बहु हाल करी दुष्काळ । कशि दया नये प्रभु तुजला ॥
पोटांत अन्न नच कांहीं । किति हाल होति हे पाहीं ॥
बघ तात सोडुनी जाऽऽई । आम्हि हीन दीन जगपाला ॥ ब०॥
जल नाहिं कुठे प्यायाला । फळ नाहिं तसें खायाला ॥
प्राणांत काळ हा आऽऽला । कशि प्रभो झोंप ये तुजला ॥ब०॥
या शोकें व्याकुळ माता । करि सदनिं नित्य आक्रांता ॥
तूं दीन जनांचा त्राऽऽता । कां असा कोप मग वरिला ॥ ब० ॥

दा०— पद चाल ( गाइ चारि यमुना तिरीं ) राग-सारंग.

गाइं ध्याइं अनुजा हरी । भक्तपालनीं दक्ष मुरारी ॥ गा० ॥
हिरण्याक्ष खल हरि संहारी । भूमि-भारही शिरिं स्वीकारी ॥गा०॥

पातालीं दे स्थान बलीला। तिष्ठत राहे रक्षक द्वारीं ॥ गा० ॥
राजनुयशा धर्माकारणि। प्रेमें राहे करी चाकरी ॥ गा० ॥

सा०-- पद चाल (आन बान जिया मिलाय)

श्रांत क्रांत दिसत अमित। शांति द्या जिवाला ॥
न्यून नसे विदित असे ॥ श्रांत० ॥
सानुकूल जें असेल। सर्व तें तुह्मां मिळेल ॥
श्रम भ्रम भय दूर होय। देवरूपिं आलां ॥ १ ॥
अन्नदान हेतु चित्तिं। मम सदनीं होउ तृप्ति ॥
तुह्मांविण जगिं देव कोण। पात्र वंदनाला ॥ १ ॥

स्त्री०-- पद चाल (निर्लज्जाकर कृष्णवदन-)

वद नच दुष्टे, गे पापिष्टे, फसविसि दुष्टे, राहुं नको इथे राहुं नको ॥
पति मम जीवन, हरिलें तनमन, शंका लवहिन, छळूं नको मज छळूं नको ॥ दुःखधुरी, गे सुसरी।
सवत खरी नच सौख्य सदनिं मज सांगतसें तुज बोलुं नको मासि बोलुं नको ॥

नायकीण:—

तवपति फसले मत्पदिं बसले मी नच आलें बोलुं नके मसि बोलुं नको ॥
वेश्या जरि मी तुजला न नमी मानिनि तशि मी बोलुं नको अशि बोलुं नको ॥
व्यर्थ अशी कां मारिसि हांका। दासि तुझीका बोलुं नको मसि बोलुं नको ॥

काव्य ३३३ १७०



मुजु०— पद चाल ( चल करुं गड्या तयारी )

खडतर अशा अकालीं, न देव वाली, परी साह्य महामारी ॥ करीत कळकळ । हरीत तळमळ वहीण केवळ गमे खरी ॥ ॥ खडतर० ॥ महामारी साह्यकारी देई द्रव्य विशाल । सदुपकारी होय भारी तोवि मला दुष्काळ ॥ काळजी हरित मदिय सारी ॥ खडतर० ॥

दा०— ( अभंग )

विठ्ठलाच्या पायीं घालीं दंडवत। चित्त शुद्ध मुक्त होसी तूंरे ॥ १ ॥
होसि तूंरे पार संसार सिंधूसी । विठ्ठल नामासी घेई बापा ॥२॥
घेइं बापा नाम विठ्ठल सदा पैं। संसृती अग्नीतें शमवीं सदा ॥३॥
शमवी सदातें विठ्ठल भजन। संसारीं ह्या सौख्य पूर्ण देई ॥ ४ ॥

वि०— पद चाल ( बँडची )

हाय! हाय! हा घात कसा । दुभंग करितो हृदय जसा ।
माझा मीचि कारण नाशा ॥ हा० ॥
दुष्काळाची संधि बरी । दैवें लाधलि गमे खरी ।
दैवचि फिरलें ह्मणुनी रडतों । धाय! धाय! धाय! ॥
कवडी कोणा नच दिधली । लाज अम्हीं ना धरिली ।
कवणा सांगूं होइल वाली ॥ हा० ॥

दा०— पद–चाल ( कमलेक्षणा )

त्यजीं हा विचार । मना हो विकार ॥ त्य० ॥
भवीं व्याधि फार । वृथा वाहि भार ।

संसार निःसार । कुठे नाहिं आधार ॥ त्य० ॥
जगीं ये दिसोनी । सुखी नाहिं प्राणी ।
करी नीच करणी । गमे भूमि भार ॥ त्य० ॥
जगीं मोहमाया । भुते सर्व खाया ।
सर्वे ना कुणी या । दिसे नाच फार ॥ त्य० ॥

ब्राह्मण— पद–चाल ( जा जा जा जा येथोनि )

हाय! हाय! हाय! हे सत्पुरुषा, चुकविं विनाशा, क्षुधित जनाशा, पुरवीं मनिशा लोक विशेषा ॥ हाय! हाय! हाय! ॥ हे० ॥ व्याकुल प्राण, नाहीं त्राण, चित्तीं आण, अससि सुजाण ॥ दुष्काळानें बहुताचि पिडिलों, चालुनि चालुनि, अतिशय थकलों, अन्नावाचुनि व्याकुळ झालों, कीर्ति एकुनी त्वरतादिं आलों ॥ हाय!० ॥

ब्राह्मणः— पद चाल (पुरुष पुंगवा)

धन्य तूं खरा । सुकुलिं जन्मुनी ॥
अन्नदान करुनि कीर्ति । मिळविली जनीं ॥
तूंचि सदयरे । विजय तव असो ॥
धर्म अर्थ काम मोक्ष, सदनिं तव वसो ॥
कर्ण धर्म तूं । सुयश तुज वरो ॥
दैन्य हरो ईश तुज शतायुषी करो ॥

दा०--  पद चाल (जमुना तट राम)

कमलाकर संकट वारी । कमलाकर ॥

भक्तरक्षणीं धांवुनि येई । दूर करी विपदा अघोरी ॥ कम० ॥
रावण कुंभी पूतनि वाला । घालि मुखांत अहा ! धूली ॥ कम० ॥
प्रभु सेवेसी सादर असतां । दे प्रभु साह्य दयाच करी ॥ क० ॥

मुजु०--  पद चाल (अधमा चांडाळा)

दुष्टा मतिभ्रष्टा मज भाससि खचितचि शत्रु जसा ।
तवकृति जरि कळतां भूप तसा । तरि तुजवरि कोपे व्याघ्र जसा ॥ दु० ॥
जनहित-तत्पर म्हणविसि कैसा । तस्कर तूं ऐसा । चढविन तुजला फांसा ॥ दु० ॥

नायकीण--  पद. चाल-(अर्पिलें सुमन)

फसविलें मला तूं आजवरी बहु कामीं ॥
योजून युक्ति बहु नामी ।
दाविते नरक तुजसि मी ।
भोगीं तुला रे सोडीं कधीं न मी ॥ फ० ॥

# अंक २ रा.

नायकिणी— पद. चाल–( घेउनि ये पंखा )

आतुर बहु झाला । लग्नाला ॥ बाइल दावुंया ॥ आ० ॥
लाथा बुक्यांचा खाऊ पोट भरोनी । मूर्खाला । देऊंया । बाइल दावुंया ॥ आ० ॥
बाइल कशि असते दाखवुं कान धरोनी । बैलाला । बांधूंया । बाइल दावुंया ॥ आ० ॥

दा०— पद. ( भजन )

गोपाल कृष्ण राधा कृष्ण । गोपाल कृष्ण राधा कृष्ण ॥ चा० ॥
श्रीकृष्णाप्रति गोपाळ सांगती सकळ । सकळांसि तूं अकळ अरे रे रे रे रे ॥ गोपा० ॥

आह्मांसंगें खेळसी । आनंदें डोलसी ॥
सखा आमुचा ह्मणवीसी । अहा हा हा हा हा ॥ गो० ॥
कान्होबाची संगती । ब्रह्मादिक इच्छिती ॥
धन्य धन्य ह्मणवीती । अरे रे रे रे रे ॥ गो० ॥
अजगर मारिला । वडवानल गिळीला ॥
गोवर्धन उचलीला । अब ब ब ब ब ॥ गो० ॥
पूतनेसी शोषिलें । नारदासि मोहिलें ॥

काव्य ३३३



गणिकेसी उद्धरीलें । अरे रे रे रे रे ॥ गो० ॥
मामा मारूं गेलासी । आपटिलें गड्यासी ॥
मल्लयुद्ध खेळसी । हुतु तु तु तु तु ॥ गो० ॥
सांडुनीया मीपण । आह्मीं घालू लोटांगण ॥
परब्रह्म नारायण । अहा हा हा हा हा ॥ गो० ॥

दा०— पद (ठुमरी राग बहिरवी)

भूपें जरि दिधलें मजसि बळी । दुःख न मानि मुळीं ॥ भू० ॥
अथवा खड्गें चिरुनी टाको । कायाही सगळी । तरि मीं दुःख न मानि मुळीं ॥ भू० ॥
परोपकारीं देह झिजवि जो । जन्मुनि सार्थ कुलीं । म्हणुनी दुःख न मानि मुळीं ॥ भू० ॥
विनति विठ्ठला तव सेवेसी । अंतरलों समुळीं ॥ भू० ॥

सा०— पद (अंजनीगीत)

नकळे कैसें संकट आलें । पतिसेवेसी कधि मी चुकलें ॥
अभागिनीच्या दैवीं लिहिलें । दुःखद मी म्हणुनी ॥ १ ॥

सा०— पद चाल (श्रम पथिचे)

दुःख कसें साहुं आतां ॥ दु० ॥
जैसा सूर्यावांचुनि दिन । राहे जलावांचुनि मीन ।
जैसें चंद्रावांचुनि गगन । तसें आपणावांचुनि सदन । कसें गमेल मजला कांता ॥ दुःख ॥
नच दिसती चरण । प्राण जाइल कुडींतून ॥

वंध्ये पोटा जन्म येणं । पती वांचुनि स्त्रीचें जीणं । कसें रुचेल मजला कांता ॥ दुःख० ॥

दा०— पद चाल ( अष्टमूर्ति परमेश )

विठ्ठल चरणीं लक्ष लावीं । सद्भावें त्या नमित जा ॥
वियोग दुःखा आवरुनीया । वडील संतां सेवित जा ॥
अनुसूया सति सावित्री तशी । तारा चरिता जागत जा ॥
गृहिणी धर्मी येति संकटें । आनंदानें सोशित जा ॥
गृह धन माया मोहा विसरुनी । परमार्थातें साधित जा ॥
सतिव्रत आचरिं स्वतः तसेंची । कुलस्त्रियांनां बोधित जा ॥
परोपकार्यीं सदैव राही । चंदनसम तनू झिजवित जा ॥
या मम बोधा ध्यानिं ठेउनी । हरि चरणामृत सेवित जा ॥

सा०— पद चाल ( धनराशी जातां )

संरक्षी माझा पतिधन ठेवा । विनवीं तुला । नमितें तुला । गृहधन सौख्या सोडुनि सलिला । गाइन निशिदिनिं पतिलीला ॥ विरहीं सुख ना अबलेला । छळिसि सतिमना । तुज उचितना । विनवीं तुला । नमितें तुला ॥ सं० ॥

---

# अंक ३ रा.

दा०— पद चाल ( अजि धन्य मी खरा )

दुर्दैवि मी असे जगांत विफल जन्मुनी ॥
तुजला मी पाहूं को ।शोधुं कीं वनीं ॥
देई त्वदीय दर्शनासि अधिर फार मी ॥ दु० ॥

परिस टाकिला। अंध म्हणउनी ॥
देई त्वदीय दर्शनासि अधिर फार मी ॥ दु० ॥
मेघ वोळला। तृषित समजुनी ॥
देई त्वदीय दर्शनासि अधिर फार मी ॥
नाहिं वंदिलें। नच चिंतिलेंहि मीं ॥
येई कृपानिधे करीं धन्य या जनीं ॥ दु० ॥

सा०— पद चाल ( अर्पुनि तुला )

पाहुं मी कुठे स्वपतिपदकमलां। दुःखित ही प्रभु बाला ॥ पा० ॥
शांति जिवा नच चैन मनाला । साहुं कशी विरहाला ॥ पा० ॥
हाः हाःकारें हृदय भरलें कंठ दाटूनि आला ॥
जगतीं शून्या तुजविण दिसे अंतरीं दाह झाला ॥
बाला ही अबला मनोज कमला। अर्पीत हारा तुला ॥
घाला कां वरिलास कोप धरिला। मी चिंतितें विठ्ठला ॥
विसरुं कशी तवलीला ॥ पाहुं० ॥

सा०— पद. चाल–( पंढरपुरास जातें बाई )

हरिविण दुजी नसे मज आस। त्यागिला। त्यागिला मोह-भवपाश ॥ हरि० ॥
मन संसारीं विटुनी गेलें। कळून ये आभास ॥ हरि० ॥
ममपति आज्ञा चिंतुनि राहीं। प्रभुचरणीं नितवास करिं मी दुजी नसे मज आस ॥ हरि० ॥

पार्व०— मम सौभाग्या रक्षण करुनी । घडविं मला पतिवास-
सनि मी करूं कुणाची आस ॥ म० ॥

सा०— शुद्ध मनानें शरण गेलिया । मंगल करि प्रभु खास ॥

दोघी० – धरुंया हरीपदाची आस । धरुंया हरीपदाची आस ।
त्यागुंया। त्यागुनी मोहभवपाश ॥ हरिविण दुजी नसो
मनिं आस ॥

दा०— पद चाल ( पावना वामना )

कोमला, निर्मला, श्यामला । साधू रंजना अतां पुजितों
तुला । अतां० ॥

हरिभक्तिरसामृत पाणी । चरणीं वाहीं सुनिर्मला ॥ सा० ॥

तव नाम सुमौक्तिक माला । अर्पी प्रेमें तव गळां ॥ सा० ॥

त्वत्कीर्ति सुगंधित तिलका । भालीं लावीं सुमंगला ॥ सा० ॥

त्वद्विरहें पोळत काया । देवो सुगंधित परिमला ॥ सा० ॥

प्रणति तुला ही शेवटची । त्वत्पदीं ठाव दे मला ॥ सा० ॥

मुजु०— पद चाल ( वचन गमत मज प्रखर )

चरणिं शरण तुज श्रीविश्वेशा । असुर कंदन सुरेशा ॥
त्रिपुरहरा हे श्रीगिरिजेशा। पाप ताप दव अघ नाशा ॥ च० ॥

 काव्य ३३३

असाधु बनुनी साधुछलि मी। स्वार्थपरायण अतितर मी सुगती त्यजिं मी, विगती वरि मी। जनन निंद्य मम श्रीनट-वेशा ॥ च० ॥

दा०— पद चाल (आलें बादशहाचें मूळ)

हे परब्रम्ह परमेश्वर पंढरिनाथा।
दे पुनरपि दर्शन बादशहा गुणवंता।
तूं भक्तासाठीं करूं नये तें केलें।
मग याच समइं कां मौनव्रत आचरिलें॥
बहु लोलुप त्वद्गुणिं गोपसख्यांवर ममता।
परकार्यिं वंचि मी देह म्हणुनि मोकलतां॥
त्वद्दर्शनि उत्सुक पाहुं नको मम अंता।
हा दीन दास मी शरण तुला भगवंता।
नच योग्य तव कृपे सरली कां रे करुणा।
मग हीन दीन मी शरण जाउं वद कवणा॥
अति पापि म्हणुनि मी प्राण त्यागुं कीं काय।
तव ब्रीद राखि तूं पंकि रुतलिसे गाय॥
मासि बोल किरे केशवा तुं शारंगधरा।
कां रुसलां हो तुम्हि रुक्माईच्या वरा॥ हे०॥

१७०



पद चाल ( नाटकरुपीं जो हा दिसला )

शेवट विनती हे जगपाला। यथा कालिं हो वृष्टि कुशाला।
रोग नासुनी आयु जनांला। धन धान्यानें भूषविं भूला ॥ शे० ॥
जप तप कष्टा कारण न उरो। सुलभ सनातन मार्ग सुविचरो।
नाम नाविका भवधी उतरो। षड्रिपु संहरिं त्रिलोकपाला ॥ शे० ॥
श्रीदत्तप्रासादिक कुशला। राजापुरकर नाट्यमंडला।
उन्नत्तीहो नतपदकमलां। अर्पित सुभक चरित्रमाला ॥ मोदें
प्रेक्षक गुणगाणिं नटला ॥ शे० ॥

REFBK-0000910

समाप्त.